मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२

www.newsexpressmarathi.com » पुणे, पिंपरी-चिंचवड » गुरुवार, दि. 28 मार्च 2024 | पान- 1

# मावळमधून संजोग वाघेरेंना उमेदवारी


## शिवसेना ठाकरे गटाची पहिली यादी जाहीर : सांगलीतून चंद्रहार पाटीलांना संधी

**पिंपरी | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीची पहिली यादी शिवसेना ठाकरे गटाने जाहीर केली आहे. मावळ मधून संजोग वाघेरे पाटील यांना तर सांगलीतून डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील यांना संधी देण्यात आली आहे. तर ठाण्यातून राजन विचारेंना संधी देण्यात आली आहे. आज यादी जाहीर होईल असं सांगण्यात आलं होतं. त्यानुसार ही यादी जाहीर करण्यात आली आहे. खासदार संजय राऊत यांनी एक्स वर यादी पोस्ट करत लोकसभेचे शिवसेना ठाकरे गटाचे १७ उमेदवार जाहीर केले आहेत.

संजोग वाघेरे यांनी पिंपरी-चिंचवड शहराचे महापौरपद भूषविले आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कट्टर समर्थक अशी त्यांची ओळख होती. राष्ट्रवादी काँग्रेस दुभंगल्यानंतर उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासोबत राहिलेल्या वाघेरे यांनी लोकसभा निवडणुकीसाठी शिवबंधन हाती बांधले. पिंपरी विधानसभा मतदारसंघ आरक्षित असलेल्याने पिंपरीगावात वास्तव्यास असलेले वाघेरे हे मावळमधून लोकसभा निवडणूक लढविण्यासाठी इच्छुक होते. दहा वर्षांपासून त्यांची तयारी सुरु होती. परंतु, संधी मिळाली नाही. आता मावळचे विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेसोबत राहण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे महाविकास आघाडीतून ठाकरे गटाकडून लढण्याची संधी वाघेरे यांना मिळाली.

पक्ष प्रवेश करताच वाघेरे यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब झाले होते. मागील तीन महिन्यांपासून त्यांनी प्रचाराला सुरुवात केली होती. रायगड दौऱ्यावर असताना उद्धव ठाकरे यांनी पंधरा दिवसांपूर्वीच वाघेरे यांची उमेदवारी जाहीर केली होती. आज अधिकृतरित्या वाघेरे यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब झाले. वाघेरे पहिल्यांदाच लोकसभा निवडणूक लढवित असून त्यांची लढत शिवसेनेचे विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांच्यासोबत होण्याची शक्यता आहे.



रायगड दौऱ्यावर असताना उद्धव ठाकरे यांनी पंधरा दिवसांपूर्वीच वाघेरे यांची उमेदवारी जाहीर केली होती. तेव्हापासून वाघेरे यांनी प्रचाराला सुरुवात केली होती. आज अधिकृतरित्या वाघेरे यांची उमेदवारी जाहीर करण्यात आली आहे. वाघेरे यांची लढत शिवसेनेचे खासदार श्रीरंग बारणे यांच्यासोबत होण्याची शक्यता आहे. वाघेरे यांना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाची आणि काँग्रेसची साथ मिळणार आहे.

### शिवसेना ठाकरे गटाचे 17 उमेदवार जाहीर

नरेंद्र खेडकर - बुलढाणा
संजय देशमुख - यवतमाळ
संजोग वाघेरे पाटील - मावळ
चंद्रहार पाटील - सांगली
नागेश आष्टिकर - हिंगोली
चंद्रकांत खैरे - छ. संभाजी नगर
ओमराजे निंबाळकर - धाराशिव
भाऊसाहेब वाघचौरे - शिर्डी
राजाभाऊ वाजे - नाशिक
अनंत गीते - रायगड
विनायक राऊत - रत्नागिरी
राजन विचारे - ठाणे
अनिल देसाई - मुंबई दक्षिण मध्य
संजय दिना पाटील - मुंबई ईशान्य
अरविंद सावंत - मुंबई दक्षिण
अमोल किर्तीकर - मुंबई वायव्य
संजय जाधव - परभणी


# संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुलातील सिंथेटिक ट्रॅक उखडला

## पालिकेच्या कामाच्या दर्जाविषयी प्रश्नचिन्ह : पाच दिवसांत उखडला सिंथेटिक ट्रॅक

**पिंपरी| प्रतिनिधी**

भोसरी इंद्रायणीनगर येथील संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुलातील सिंथेटिक ट्रॅक अवघ्या आठवड्याभरात उखडला आहे. या कामावर चार कोटी रुपयांचा खर्च केला आहे. सिंथेटिक ट्रॅक उखडल्याने संकुल पुन्हा स्थापत्यविषयक दुरुस्तीच्या कामासाठी बंद केला आहे. उद्योजक संघटनेचे अध्यक्ष जयदेव अक्कोलकोटे, एसकेएफचे स्वानंद पाचपाठक, हॉटेल व्यावसायिकांचे प्रतिनिधी दिपक पाटील, विद्यार्थी व युवा संघटनेचे अध्यक्ष दिनेश पाटील, विठ्ठल ओझरकर, नितीन कांबळे, बापुसाहेब वाघेरे विविध कंपन्यांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

भोसरीतील इंद्रायणीनगर मध्ये पूर्वी बसविण्यात आलेला सिंथेटिक ट्रॅक नादुरुस्त झाल्याने नव्याने सिंथेटिक ट्रॅक उभारण्याचे काम गेल्या वर्षी हाती घेतले होते. अतिशय संथ गतीने सुरू झालेले काम यावर्षी मार्च महिन्यात संपून हा ट्रॅक खेळांडूसाठी खुला करण्यात आला होता. ट्रॅकवर खेळाडू सराव करत असताना अवघ्या पाचच दिवसांत हा ट्रॅक उखडण्यास सुरूवात झाल्याने खेळाडूंमध्ये निराशा पसरली आहे. साधे बूट घालून ट्रॅकवर सराव करत असतानादेखील हा ट्रॅक उखडत आहे. धावण्याच्या शर्यतीतील स्पाइक बूटाला तळाकडच्या बाजूला खिळे असतात. अशा प्रकारचा बूट घालून या ट्रॅकवर सराव केल्यास हा ट्रॅक टिकणारच नसल्याचे काही खेळाडूंनी सांगितले. त्यामुळे, या ट्रॅकच्या दर्जाबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुलातील लॉन्स, टेनिस कोर्टच्या नूतनीकरणासह ट्रॅक उभारण्यावर महापालिकेने तब्बल चार कोटी रुपये खर्च केले आहेत. मात्र, ट्रॅक सुरू झाल्यानंतर अवघ्या पाचच दिवसांनी हा ट्रॅक उखडल्याने महापालिकेचा खर्च वाया जाण्याची भीती काही नागरिकांनी व्यक्त केली. सिंथेटिक ट्रॅक उखडल्याने स्थापत्यविषयक कामासाठी संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल बंद ठेवण्यात आले आहे.



सह शहर अभियंता मनोज सेठिया म्हणाले की, ठेकेदाराला अद्याप पूर्ण मोबदला देण्यात आलेला नाही. ट्रॅकची पाहणी करून पुढील निर्णय घेण्यात येईल. आवश्यकता वाटल्यास ट्रॅक विषयी त्रयस्थ व्यक्ती अथवा संस्थेद्वारे पाहणी करून माहिती मिळविण्यात येईल.

# वाडेश्वर कट्ट्यावर मोहोळ, धंगेकर अन् मोरेंमध्ये गप्पा!

## ब्रेकफास्ट विथ उमेदवार : पुण्यातील विविध विषयांवर गप्पा, उमेदवारांची प्रचाराला सुरुवात

**पुणे | प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीला अवघे काही दिवस राहिले आहेत. जाहीर झालेल्या उमेदवारांनी प्रचाराला सुरुवात केलीय. आपल्या प्रतिस्पर्ध्याचा कसा पराभव करता येईल याची चाचपणी करताना दिसत असलेले पुण्यातील उमेदवार मात्र आज एकाच टेबलवर बसून नाष्टा करताना दिसले. निमित्त म्हणजे पुण्यातील वाडेश्वर कट्टा. हा कट्टा म्हणजे राजकीय मंडळींसाठी अराजकीय व्यासपीठ जिथे राजकारणाच्या पलीकडचं नातं जपलं जातं.

पुणे लोकसभेसाठी महायुतीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ, महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर आणि अपक्ष उमेदवार वसंत मोरे हे तिघे ही जणं याच कट्ट्यावर एकत्र आले. पुढच्या काही दिवसांमधे जे उमेदवार एकमेकांविरुद्ध प्रचाराची राळ उठवताना दिसतील मात्र त्यापूर्वी या कट्ट्यवर या तिघांमध्ये चवदार पदार्थ आणि रसभरीत राजकीय गप्पा रंगताना दिसल्या.

पुणे लोकसभेसाठी महाविकास आघाडी आणि महायुतीचे उमेदवार जाहीर झाले आहेत. मायुतीकडून मुरलीधर महोळ उमेदवार आहेत तर महाविकास आघाडीकडून रवींद्र धंगेकरांना उमेदवारी देण्यात आली आहे. दोघांमध्ये तगडी लढत होणार आहे. त्यात वसंत मोरेदेखील लोकसभा निवडणूक लढवण्याच्या तयारीत आहे. मात्र त्यापूर्वीच पुण्यातील प्रसिद्ध वाडेश्वर कट्ट्यावर तीघेही एकत्र आले. एरवी एकमेकांवर ताशेरे ओढणारे मोहोळ आणि धंगेकर यांच्यात एकत्र बसून पुण्यातील विविध विषयांवर गप्पा रंगल्या. येत्या निवडणुकीत एकमेकांच्या विरोधात उभे ठाकलेले उमेदवार कट्ट्यावर एकत्र पाहायला मिळाले.



**पुणेकांच्या समस्या सोडवणार**

या कट्ट्यात अनेक राजकीय चर्चा रंगल्याच मात्र पुणेकरांच्या समस्यांवरदेखील चर्चा झाली. राजकारण करताना पुणेकरांच्या समस्यांकडे दुर्लक्ष झाल्याचं आतापर्यंत दिसलं आहे. वाहतूक कोंडी, प्रदुषण, पाण्याच्या समस्या अशा अनेक समस्या सध्या पुणेकरांना आहेत. याच समस्यांवर काम करणार आणि निवडणूकीत हेच मुद्दे हायलाईट करणार असल्याचं मुरलीधर मोहोळ आणि रवींद्र धंगेकरांनी सांगितलं आहे.

दोन्ही उमेदवारांसोबत वसंत मोरेदेखील दिसते. वसंत मोरे पुण्यातले तिसरे उमेदवार असतील अशा चर्चा रंगल्या असतानाच ते वाडेश्वर कट्ट्यावर आले होते. त्यांनीदेखील राजकीय आणि सामाजिक विषयांवर चर्चा केली. खास पुणेकरांच्या हितासाठी मी मनसेतून बाहेर पडलो. पुणेकरांसाठी मी निवडणूक लढवण्यासाठी तयार आहे. मला पुणे शहराला वेगळी दिशा द्यायची आहे, असं वसंत मोरे म्हणाले.

### वसंत मोरे उभारताहेत 'वॉर रुम'

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला 'राम राम' ठोकल्यानंतर वसंत मोरे यांनी पुणे लोकसभेची उमेदवारी मिळण्यासाठी महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या भेटीगाठी घेतल्या. मात्र, महाविकास आघाडीकडून आमदार रवींद्र धंगेकर यांच्या गळ्यात उमेदवारीची माळ पडली आहे. त्यामुळे वसंत मोरे यांनी अपक्ष म्हणून या निवडणुकीला सामोरे जाण्याचा निश्चय केला असून, त्याच्या तयारीला लागल्याचे दिसून येत आहे.

महाविकास आघाडीकडून आपल्याला लोकसभेचे तिकीट मिळण्यासाठी मोरे प्रयत्नशील होते. पण, त्यात मोरेंना यश आलं नाही. त्यामुळे मोरे आता अपक्ष म्हणूनच निवडणूक रिंगणात उतरणार आहेत. यासाठी मोरेंनी तयारी सुरू केली असून, निवडणूक वॉर रूम तयार करण्याचे काम हाती घेतले आहे.

# पुण्यात तापमानाने गाठली चाळीशी

## उष्णतेच्या झळा पुढील तीन-चार दिवस कायम

**पुणे | प्रतिनिधी**

दिवसें-दिवस राज्याचे तापमान वाढत आहे. पुणे शहरात मंगळवारी तापमानाने चाळीशी गाठली . काल पुणे शहर परिसरातील लवळे येथे 40.9 अंश सेल्सिअस इतक्या सर्वाधिक तापमानाची नोंद झाली. या उष्णतेच्या झळा पुढील तीन-चार दिवस कायम राहण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.



मंगळवारी सकाळपासूनच उन्हाचा झळा जाणवत होत्या. दुपारी 12 ते 4 दरम्यान उन्हाची तीव्रता बरीच वाढली .लवळे येथे मंगळवारी 40.9 अंश सेल्सिअस इतक्या सर्वाधिक तापमानाची नोंद झाली. पाषाण, लोहगाव आणि मगरपट्टा येथे कमाल तापमानाच्या पाऱ्याने 39 अंश सेल्सिअसचा टप्पा ओलांडला. पुण्यात सलग दुसऱ्या दिवशी यंदाच्या उन्हाळ्यातील 38.9 अंश सेल्सिअस इतके उच्चांकी तापमान कायम राहिले.

शहरासह जिल्ह्यात मागील आठ दिवसांपूर्वी शहरातील कमाल तापमान 35 ते 36 अंशावर असले तरी किमान तापमान 12 ते 15 च्या जवळपास होते. त्यामुळे दिवसा उन्हाचा चटका आणि रात्री गारवा अशी परिस्थिती होती. मागील, मागील दोन ते तीन दिवसात कमाल तापमानासह किमान तापमानातही लक्षणीय वाढ झाली आहे. त्यामुळे रात्रीचा गारवा कमी होवून उकाडा वाढू लागला आहे.

**वाढत्या उन्हामुळे होऊ शकतो उष्माघात**

हळुहळू उन्हाळ्याची चाहुल लागायला सुरुवात झाली आहे. उष्माघातापासून बचाव करण्यासाठी हे उपाय करा.

उष्णतेमुळे शरीरातील इलेक्ट्रोलाइट्स कमी होऊ लागतात, ते परत मिळवण्यासाठी नारळपाणी प्यावे. उष्माघात टाळण्यासाठी कांद्याचा वापर करावा. शरीरातील उष्णता कमी करण्यासाठी कैरीचे पन्हे आवर्जून प्यावे. कैरीचे पन्हे प्यायल्यानंतर उन्हात गेल्यास उष्णता जाणवणार नाही. दही आणि मीठापासून बनवलेले ताक उन्हाळ्यात प्यावे. यामुळे शरीर थंड होते व उष्माघाताचा धोका कमी होतो.

# बिबट्या शिरला चक्क हॉस्पिटलमध्ये

## वनरक्षकावर केला हल्ला तर बिबट्याला पकडण्यासाठी मोठी कसरत

**पुणे | प्रतिनिधी**

हल्ली पुण्यात बिबट्याचा वावर वाढला असून बिबट्या शेतात, घराबाहेर फिरण्याचे प्रसंग वारंवार घडताना दिसत आहेत. अशातच मंगळवारी रात्री आळेफाटा येथे एक बिबट्या चक्क रुग्णालयात शिरल्याचा धक्कादायक प्रकार घडला. यावेळी बिबट्याने एका वनरक्षकावर हल्ला देखील केल्याची घटना घडली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, भक्ष्याच्या शोधात असलेला बिबट्या आळेफाटा येथील एका खासगी रुग्णालयात शिरला. रात्रीचे साडेनऊ ते दहाची वेळ असल्याने रुग्णांचे वॉर्ड बंद होते. यामुळे मोठी दुर्घटना टळली असली तरी वनरक्षकांना बिबट्याला पकडण्यासाठी मोठी कसरत करावी लागली.

बिबट्या हॉस्पिटलमध्ये शिरताच वनरक्षकांना तातडीने बोलवण्यात आले. त्यांनी बिबट्याला पकडण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले. यावेळी बिबट्याने कैलास भालेराव या वनरक्षकांवर हल्ला केला. त्यांच्या हाताला गंभीर दुखापत झाली असून त्यांना टाकेही पडले आहेत.

या दरम्यान बिबट्या एका खिडकीतून उडी मारून दुसऱ्या पत्र्यावर गेला आणि तिथून जंगलात पळून गेला. बिबट्या भक्ष्याच्या शोधातआताशहरातशिरतआहे.त्यामुळे वन विभागाने यावर तातडीने उपाययोजना करणे गरजेचे आहे.



# निवासी मालमत्ताधारकांकडे 354 कोटी थकबाकी

## शहरात सहा लाख 25 हजार मालमत्ता : चार लाख 33 हजार मालमत्ताधारकांनी पूर्ण कराचा भरणा

**पिंपरी | प्रतिनिधी**

आर्थिक वर्ष संपण्यास अवघे सहा दिवस शिल्लक असतानाही पिंपरी-चिंचवड शहरातील एक लाख ४८ हजार २०३ निवासी मालमत्ताधारकांकडे ३५४ कोटी रुपयांची थकबाकी असल्याचे समोर आले. थकबाकीदारांनी कर भरण्याचे आवाहन महापालिकेने केले. तसेच देयकामधील कचरा सेवाशुल्क वगळून कर भरता येणार असल्याचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे-पाटील यांनी स्पष्ट केले आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात सहा लाख २५ हजार मालमत्ता आहेत. यापैकी चार लाख ३३ हजार ७५९ मालमत्ताधारकांनी पूर्ण कराचा भरणा केला आहे. त्यामुळे आत्तापर्यंत महापालिकेच्या तिजोरीत ८८६ कोटींचा महसूल जमा झाला आहे. चालू आर्थिक वर्षात कर संकलन विभागाला एक हजार कोटींचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. सहा दिवसांत ११४ कोटींची वसुली करण्याचे आव्हान कर संकलन विभागासमोर असणार आहे. विभागाकडून थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करणे, लाखबंद (सील), वर्तमानपत्रात नावे प्रसिद्ध करणे, नळजोड खंडित करणे, जनजागृती करण्यासह विविध मोहिमा हाती घेतल्या आहेत.

कर संकलन विभागाचे कर्मचारी मालमत्ताधारकांकडे कर वसुलीसाठी जातात, तेव्हा कचरा सेवाशुल्क रद्द झाला असताना त्या रक्कमेचा देयकात समावेश झाल्याने कर भरला नसल्याचे मालत्ताधारकांनी सांगितले. मात्र, ऑनलाइन देयकात कचरा सेवाशुल्काची रक्कम दिसत असली, तरी शासन आदेशानुसार शुल्क वसुलीला स्थगिती देण्यात आली आहे. देयकामध्ये एकूण भरायची जी रक्कम आहे, ती कचरा सेवाशुल्क वजा करून दर्शविण्यात आली आहे. मालमत्ताधारकांना



कचरा सेवाशुल्क भरण्याची आवश्यकता नाही. तसेच अंतिम रक्कम जी देयकामध्ये दर्शविण्यात आली आहे. त्यामध्ये कचरा सेवाशुल्काचा समावेश नाही. त्यामुळे मालमत्ताधारकांनी थकीत कर त्वरित भरावा, असे आवाहन सहायक आयुक्त नीलेश देशमुख यांनी केले.

जनजागृती, वारंवार आवाहन, जप्तीपूर्व नोटीस, मोबाईलवर एसएमएस पाठवून थकबाकीदारांना कर भरण्याबाबत सूचित करण्यात आले आहे. मात्र, त्यानंतरही कर न भरणा-या बाबत कठोर पाऊले उचलण्यास कर संकलन विभागाने सुरुवात केली आहे. शहरात थकबाकीदारांमध्ये रहिवासी मालमत्तांची संख्या मोठी आहे. अशा मालमत्ताधारकांना पाच वेळा भेटी देऊन कर भरण्याबाबत सूचना केल्या, मालमत्ता जप्त होण्याचा इशारा दिला. त्यानंतरही थकबाकीदार नागरिक कर भरण्यास प्रतिसाद देत नाहीत. वास्तविक मानवतेच्या दृष्टिकोनातून महापालिका रहिवासी सदनिका सिल करत नाही. मात्र, आता यापुढे अशा थकबाकीदारांच्या मालमत्ता जप्त करण्यात येणार आहेत. मात्र ही जप्ती मालमत्ता सिल न करता किंवा कुठलीही जंगम मालमत्ता जप्त न करता केली जाणार आहे. त्यासाठी सदर मालमत्तेवर जप्ती अधिपत्र डकवले जात आहे.

प्रत्येक झोनला निवासी, बिगर निवासी किती जप्त्या करायच्या, नळजोड किती खंडित करायचे, यांचे दैनंदिन उद्दिष्ट ठरवून देण्यात आले आहे. त्याचबरोबर टेलिकॉलिंग किती करायचे, यांचे नियोजन केले आहे. टेलिकॉलिंगच्या माध्यमातून जवळपास दररोज चार हजार थकबाकीदारांना फोन केले जात आहेत. याचाही कर संकलन विभागाला मोठा फायदा होत आहे.

वारंवार आवाहन करूनही कर न भरणाऱ्या १७ झोनमधील तब्बल २८३ मालमत्ता जप्त करण्यात आल्या आहेत.

### वाकड झोनमध्ये सर्वाधिक कर

शहरात कर संकलनासाठी महापालिकेचे १७ झोन आहेत. यामध्ये वाकड झोनमध्ये सर्वाधिक म्हणजे ५६ हजार मालमत्ताधारकांनी ११० कोटी रुपयांचा कर जमा केला आहे. त्या खालोखाल थेरगाव, चिखली, भोसरी, सांगवी, चिंचवड, मोशी झोनमध्ये कराचा भरणा झाला आहे, तर सर्वात कमी तळवडे झोनमध्ये फक्त ६ हजार १२ मालमत्ताधारकांनी १५ कोटी ९० लाखांचा कर भरणा केला आहे.

# नाकाबंदी दरम्यान सापडले 50 लाख

## निवडणुकांत मोठ्या प्रमाणात घोडेबाजार होण्याची शक्यता

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी- चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या हद्दीमध्ये नाकाबंदी दरम्यान शिरगाव पोलिसांनी पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर तब्बल ५० लाखांची रोकड आढळली आहे. याबाबत शिरगाव पोलीस अधिक तपास करत आहेत. नेमकी ही रक्कम कुठे आणि कशासाठी घेऊन जात होते. याबाबतची चौकशी शिरगाव पोलीस करत आहेत. अशी माहिती पोलीस उपायुक्त बापू बांगर यांनी दिली आहे.



अवघ्या देशासह महाराष्ट्रात लोकसभा निवडणुका लागल्या आहेत. आचारसंहिता लागली आहे यामुळे मावळ लोकसभेसह इतर मतदारसंघात नाकाबंदी करण्यात येत आहे. मावळ लोकसभा मतदारसंघाच्या पुणे-मुंबई  द्रुतगती मार्गावर नाका बंदी दरम्यान शिरगाव पोलिसांनी चारचाकी वाहनात तब्बल ५० लाख रुपयांची रोकड मिळून आली आहे. मुंबईहून पुण्याच्या दिशेने ही चार चाकी जात असताना पोलिसांनी अडवली. यात ५० लाख रुपये आढळले आहेत. एवढी मोठी रक्कम कुठे आणि कशासाठी घेऊन जात होते. याबाबतची चौकशी शिरगाव पोलीस करत आहेत. सध्या लोकसभा निवडणुका लागल्याने मोठ्या प्रमाणावर घोडेबाजार होण्याची शक्यता आहे. त्याच अनुषंगाने पिंपरी-चिंचवड पोलीस तपास करत आहेत.

### शिरगाव पोलिसांची कारवाई..

मावळ लोकसभा मतदारसंघाच्या पुणे-मुंबई द्रुतगती मार्गावर नाकाबंदी दरम्यान शिरगाव पोलिसांनी एका स्कॉर्पिओ मध्ये तब्बल ५० लाख रुपयांची रोकड मिळून आली आहे.मुंबईहून पुण्याच्या दिशेने ही स्कॉर्पिओ जात असताना पोलिसांनी अडवली. यात ५० लाख रुपये आढळले आहेत. एवढी मोठी रक्कम कुठे आणि कशासाठी घेऊन जात होते. याबाबतची चौकशी शिरगाव पोलीस करत आहेत. सध्या लोकसभा निवडणुका लागल्याने मोठ्या प्रमाणावर घोडेबाजार होण्याची शक्यता आहे. त्याच अनुषंगाने पिंपरी- चिंचवड पोलीस तपास करत आहेत..

# निवडणुकीत शस्त्र बाळगण्यास निर्बंध लागू



**पिंपरी | प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाने लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर केला असून जिल्ह्यात फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ तसेच शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम १७(३)(ए) व (बी) अन्वये जिल्हाधिकारी डॉ. सुहास दिवसे यांनी निर्बंध लागू केले आहेत. पोटनिवडणूक सुरळीत, शांततेत व निर्भय वातावरणात पार पाडण्यासाठी तसेच कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये म्हणून ६ जूनपर्यंत हे निर्बंध राहणार आहेत.

या कालावधीत नागरिकांना स्वत:जवळ परवानाप्राप्त अग्नीशस्त्रे, हत्यारे, दारुगोळा बाळगण्यास व बरोबर नेण्यास मनाई करण्यात आली आहे. या आदेशातून बंदोबस्तासाठी असणारे अधिकारी, कर्मचारी तसेच बँका व सार्वजनिक मालमत्तेच्या सुरक्षिततेसाठी नेमण्यात आलेले सुरक्षा कर्मचारी यांना वगळण्यात आले आहे.

बँका अथवा सार्वजनिक संस्था यांच्यावर निवडणूक कालावधीत त्यांच्याकडील हत्यारांचा गैरवापर होणार नाही याची जबाबदारी राहील. या आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय दंड विधान कायदा कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र राहील, असेही जिल्हाधिकारी यांनी जारी केलेल्या आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# तुकाराम बीज सोहळ्यात भाविकांची अलोट गर्दी

## देहूनगरीत दिव्य सोहळ्यासाठी राज्यातून लाखो वारकरी दाखल



**पुणे | प्रतिनिधी**

भाविकांच्या अभंगगजरात बुधवारी देहूनगरी दुमदुमली. भजनी दिंड्यांनी रात्रभर केलेला जागर, काकडआरती, महापूजा, हरिपाठ अन् वीणा, टाळ, मृदंग, चिपळ्यांची साथ अशा भक्तिमय वातावरणात बीज सोहळ्याला अलोट गर्दी झाली आहे. संत तुकाराम महाराजांच्या ३७६ व्या बीज सोहळ्यासाठी लाखो भाविक देहूमध्ये दाखल झाले आहेत.

जगद्गुरू संत तुकाराम महाराज यांचे आजच्या दिवशी सदेह वैकुंठ गमन झाले. त्यामुळे हा दिवस तुकाराम बीज म्हणून ओळखला जातो. यंदाचे बीज सोहळ्याचे ३७६ वर्षे आहे. देहूनगरीत या दिव्य सोहळ्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून लाखो वारकरी दाखल झाले. पहाटे तीन वाजता मुख्य देऊळवाड्यात काकड आरती झाली. पहाटे चार वाजता संस्थानचे विश्वस्त, अध्यक्ष मंडळ, वंशज, वारकरी यांच्या हस्ते श्री पूजा, संत तुकाराम महाराज शिळा मंदिरात महापूजा झाली. पहाटे साडेचार वाजता विठ्ठल रुक्मिणी मंदिरात पूजा झाली. पहाटे सहा वाजता वैकुंठगमन स्थान येथील संत तुकाराम महाराज मंदिरात महापूजा झाली.

सकाळी साडेदहा वाजता पालखीचे वैकुंठस्थान मंदिराकडे प्रस्थान झाले. त्यानंतर वैकुंठगमन सोहळ्यात देहूकर महाराजांचे कीर्तन झाले. दुपारी बारापर्यंत तुकोबारायांच्या नामाचा, विठ्ठलाच्या नामाचा गजर झाला. नांदुरकीच्या वृक्षावर फुलांची उधळण करून आणि मनोभावे हात जोडत भाविकांनी इंद्रायणीच्या काठी भक्तिचैतन्य फुलविले. दुपारी साडेबारा वाजता वैकुंठस्थान येथून पालखीचे मुख्य देऊळवाड्यातील मंदिराकडे आगमन झाले.

भाविक मिळेल त्या वाहनाने तसेच खाजगी वाहनाने ये-जा करताना दिसत होते. पुणे महानगर परिवहन सेवेने देखील भाविकांची व्यवस्था केली होती. यात राज्य परिवहन सेवेने प्रवासी बस सेवा उपलब्ध्द करून दिल्या होत्या. ध्वनिक्षेपकांवरून महिलांना चोरांपासून सावध राहण्याच्या सूचना देण्यात येत होत्या. देहू, आळंदी, पंढरपूर देव दर्शन करून काही भाविक यात्रा करीत असतात. या वर्षीही राज्यभरातून भाविकांनी गर्दी केली होती. भाविकांना कमी वेळेत सुरक्षित, सुरळीत दर्शन व्यवस्था आणि भाविकांची सुरक्षा यावर विशेष लक्ष देण्यात आल्याचे कनिष्ठ अभियंता संघपाल गायकवाड यांनी सांगितले. शांतता आणि प्रभावी पोलीस बंदोबस्त यासाठी पोलीस आयुक्तालयाने मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.

इंद्रायणी नदी घाटावर, संत तुकाराम महाराज मंदिर, गाथा मंदिर आणि श्री वैकुंठ गमन स्थान मंदिर येथे भाविकांनी इंद्रायणी नदी घाटावर स्नानास गर्दी केली असून तीर्थक्षेत्री स्नान माहात्म्य जोपासले जात आहे. देहू नगरपंचायतीने विविध सेवा सुविधा उपलब्ध करून दिल्या असून पिण्याचे पाणी, आरोग्य सेवा, स्वच्छता प्रभावी पणे उपलब्ध करून दिल्या आहेत.

### देहू देवस्थान यांचे नियोजन

देहू नगरपंचायत पदाधीकारी, प्रशासन, पोलीस प्रशासन आणि देहू देवस्थान यांनी सुसंवाद ठेवून नियोजन केले आहे. पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून भाविक आणि मंदिर परिसरात सुरक्षितता राहण्याचे दृष्टीने पोलीस तसेच पोलीस मित्र कार्यरत आहेत. घाटावर तसेच मंदिरात भाविकांनी रांगा लावून श्रीचे दर्शन घेतले. देहू परिसरात महिला, पुरुष भाविकांचे गर्दीने रस्ते फुलले होते. मंदिरात प्रभावी दर्शन व्यवस्थेने भाविकांचे सुलभ दर्शन झाल्याने भाविकांनी समाधान व्यक्त केले. इंद्रायणी नदी घाटावर देखील भाविकांनी गर्दी केली होती.

# पवारांच्या टीकेला अजितदादांचं प्रत्युत्तर

## 'सगळीकडे साथ हवी,देशाचं भवितव्य ठरवणारी निवडणूक'; अजित पवार




**पुणे | प्रतिनिधी**

लोकसभेच्या निवडणुकीवर बोलताना विरोधी पक्षातील नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर जोरदार टीका करत आहेत. शरद पवार यांनी मोदींवर केलेल्या टीकेला अजित पवार यांनी उत्तर दिलं आहे.

नरेंद्र मोदी जर पुन्हा एकदा देशाचे पंतप्रधान झाले तर ते देशाचं संविधान बदलतील. त्याचसाठी भाजप आणि विशेषत: नरेंद्र मोदी हे 400 पारचा नारा देत आहेत, असं विधान राष्ट्रवादीचे नेते शरद पवार यांनी म्हटलं होतं. पवारांसोबतच विरोधी पक्षातील इतर नेतेही हीच टीका करताना दिसतात. त्याला राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी उत्तर दिलं आहे. लोकशाहीत कुणी कुणाचं काम करायचं. तो ज्याचा त्याचा अधिकार आहे. पण देश आज पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखाली देश पुढे जात आहे. मात्र काही लोकं गैरसमज पसरवत आहेत. जर 2024 मध्ये मोदी सरकार आलं तर ते देशाची राज्यघटना बदलतील... असं काहीही म्हटलं जातंय. पण तसं काहीही होणार नाही, असं म्हणत अजित पवार यांनी शरद पवारांच्या मोदींवरील टीकेला प्रत्युत्तर दिलंय. ते पुण्यात बोलत होते.

राष्ट्रवादी फुटीनंतर राज्यात शरद पवारांच्या भूमिकेबाबत संभ्रमाचे वातावरण आहे, याबाबत आपली भाजपविरोधातील भूमिका स्पष्ट असल्याचे पवारांनी सांगितले. ते म्हणाले, आमचे सहकारी फुटून सत्तेत सहभागी झाले हे खरे आहे. मात्र आमची भूमिका कायम आहे. आमचे कार्यकर्ते आमच्या सहकारी पक्षांत याबाबत काहीही संभ्रम नाही. त्या लोकांना राज्याचे मतदार २०२४ मध्ये त्यांची दाखवतील. आमची भाजपविरोधातील भूमिका कायम असून इंडियात विजयी होण्यासाठी काम करणार आहे", असे पवारांनी स्पष्टपणे सांगितले.

### देशाचं भवितव्य ठरवणारी निवडणूक...

लोकांनी अनेकदा आम्हाला या मतदारसंघाची प्रतिनिधित्व करण्याची संधी दिली आहे. या ठिकाणी मुरलीधर मोहोळ यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यांना संसदेत पाठवण्याचं काम तुम्हाला करायचं आहे. एकंदरीत राजकीय कल बघता मुरलीधर मोहोळ चांगल्या मतांनी निवडून येण्यास काही अडचण येणार नाही. ही निवडणूक देशाचं भवितव्य ठरवणारी आहे. काही लोकं दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहेत. क्रीडा क्षेत्रासाठी मी काम केलं आहे,कुठलीही अडचण येऊ दिली नाही. महायुतीच्या माध्यमातून आम्ही काम करतोय. महाराष्ट्राचा सर्वांगिक विकास कसा होईल हे बघतोय, असंही अजित पवार म्हणाले. लोकांनी अनेकदा आम्हाला या मतदारसंघाची प्रतिनिधित्व करण्याची संधी दिली आहे. या ठिकाणी मुरलीधर मोहोळ यांना उमेदवारी देण्यात आली आहे. त्यांना संसदेत पाठवण्याचं काम तुम्हाला करायचं आहे. एकंदरीत राजकीय कल बघता मुरलीधर मोहोळ चांगल्या मतांनी निवडून येण्यास काही अडचण येणार नाही. ही निवडणूक देशाचं भवितव्य ठरवणारी आहे. काही लोकं दिशाभूल करण्याचा प्रयत्न करत आहेत. क्रीडा क्षेत्रासाठी मी काम केलं आहे,कुठलीही अडचण येऊ दिली नाही. महायुतीच्या माध्यमातून आम्ही काम करतोय. महाराष्ट्राचा सर्वांगिक विकास कसा होईल हे बघतोय, असंही अजित पवार म्हणाले.